N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** जिल्हापेठ

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0060 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**03/02/2023 00:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 02/02/2023

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/02/2023

**Time From (वेळेपासून):** 17:06 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 02/02/2023 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 039

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/02/2023 23:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भिकमचंद जैन मार्कट ,जळगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** क्रिष्णवर्धन राजेंद्र पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लट नं1,श्रीरत्न काम्लनी पिंप्राळा , ताजिजळगांव ,जिल्हापेठ ,जळगाव, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लट नं1,श्रीरत्न काम्लनी पिंप्राळा , ताजिजळगांव ,जिल्हापेठ ,जळगाव, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हेमंत दत्तात्रय बडगुजर | | | 1. प्लाट नं 14,ईंद्रप्रस्थ नगर, शिवाजी नगर जवळ जळगाव, जिल्हापेठ ,जळगाव,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

गुन्हयाची थोडक्यात हकीकत यातील तक्रार यांनी फि//यांच्या व त्याचा पत्नीचे कौटुंबिक वादविवाद सुरु असुन ते दोघे विभक्त राहत आहेत फि// यांची पत्नी नांदायला यावी म्हणून त्यानी कौटुबिक न्यायालय जळगाव येथे दावा दाखल केला होता.त्याप्रमाणे फि// यांची पत्नी हर्षा हिने देखील फि//विरुध्द अंतरीम खावटी व न्यायालय खर्चाची रक्कम मिळणे साठी च्या अर्ज दाखल केला आहे.त्यानुसार मा.न्यायालयाने फि// यांना 5,000रू प्रमाणे खावटीची रक्कम देण्याचे आदेश दिले होते. परंतु फि// पत्नीने थकित खावटीची 85,000रु. एकरकमी रक्कम मिळणे बाबत कौटुबिक न्यायालय जळगाव येथे माहे 08/2022मध्ये दरखास्त अर्ज दाखल केला आहे.

फि// पत्नीने दिलेल्या अर्जावर सुनावणी साठी फि// यांना दि.02/01/2023समज व्दारे मा.कौटुबिक न्यायालय जळगाव येथे हजर राहण्याचा आदेश झाला होता त्याप्रमाणे फि// हे दि.02/01/2023रोजी मा.कौटुबिक न्यायालय जळगाव येथे हजर राहुन कोर्टातील सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांची भेट घेतली त्यावेळी फि// ने त्यांना माझ्या पत्नीने केलेल्या अर्जावर वकिला मार्फत म्हणणे सादरकरण्यासाठी काही कालावधीची अवश्यकता आहे. तसेच अंतरीम खावटीची थकीत रक्कम एकदम जमविण्यास वेळ लागेल असे सांगीतले त्यासाठी मला पुढील तारीख देण्याबाबत विनंती केली असता तेव्हा सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांनी फि// दि.02/02/2023तारीख देऊन सदर तारखेच्या आत भेटण्यासाठी बोलविले होते त्यानुसार फि// हे दि. 19/01/2023रोजी सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांना जाउन भेटले असता त्यानी फी// तुमच्या प्रकरण सुनावणीची तारीख 02/02/2023 ठेवलेली आहे त्यावेळेस मी तुम्हाला महीना 15दिवस लांबची तारीख देईल असे सांगुन 200रु लाच रक्कम मागणी केली होती त्याबाबत फि// यांनी दि.02/02/2023रोजी अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव कार्यालयात तक्रार दिली होती

सदर तक्रारीची अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव पथकाने दोन पंचासमक्ष दिनांक 02/02/2023 रोजी पडताळणी केली असता आलोसे यानी फि//पत्नीने फि// विरुध्द अंतरीम खावटीची थकीत रक्कम मिळणेसाठी च्या केलेल्या अर्जावर वकीला मार्फत म्हणणे सादर करण्यासाठी व थकीत रक्कम एक रकमी भरण्यासाठी पुढील तारीख वाढवुन देण्याचा मोबदल्यात फि//200रु. लाच मागणी करुन सदर लाचेची रक्कम वर नमुद ठिकाणी स्विकारली म्हणुन गुन्हा
सोबत संगणीकृत केलेली फिर्याद सोबत जोडली आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
Kishor Gangadhar Pawar
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):**
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

(पो.ना.१६३७,जितेंद्र सुरवाडे)
पोलीस ठाणे अंमलदार
जिल्हापेठ पोलीस स्टेशन,जळगांव

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): arun kashinath dhar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PSMH27070

पोलीस निरीक्षक सत्यमेव जयते शनिपेठ पो.स्टे.जळगाव

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**

फिर्याद

जिल्हापेठ पोलीस स्टेशन
दिनांक ०२/०२/२०२३

**मी किष्णवर्धन राजेंद्र पाटील, वय ३१ वर्षे, व्यवसाय मोल मजुरी,**
**रा.प्लॉट नं.१ श्रीरत्न कॉलनी, पिंप्राळा, ता.जि.जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे आई वडील व भाऊ यांचे सह राहावयास असुन मोलमजुरी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी आज दि.०२.०२.२०२३ रोजी सकाळी जळगांव ॲन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयात समक्ष हजर राहुन पोलीस निरीक्षक एस.के.बच्छाव साहेब यांचे समक्ष कौटुंबिक न्यायालय, जळगांव कार्यालयातील लोकसेवक यांचे विरुध्द तक्रार दिली ती खालील प्रमाणे

माझे लग्न सन २०१६ साली उल्हासनगर जि.ठाणे येथील गुलाब सुर्यवंशी यांची मुलगी हर्षा हिचेशी रिती रिवाजाप्रमाणे झाले होते. मला पत्नी हर्षा हिचे पासुन एक मुलगी असुन तिचे नाव योगीशा आहे. व ती आता ५ वर्षाची आहे. माझेत व माझ्या पत्नीचे कौटुंबिक वाद विवाद झाल्याने ती सन २०१९ पासुन तिचे माहेरी उल्हासनगर जि.ठाणे येथे निघुन गेली आहे. तेव्हा पासुन आम्ही दोघे विभक्त राहत आहोत.

माझी पत्नी माझे कडेस नांदायला यावी म्हणुन मी कौटुंबिक न्यायालय जळगांव येथे सन २०२० मध्ये दावा दाखल केला होता. सदरचे प्रकरण हे कौटुंबिक न्यायालय जळगांव येथे चालु असतांना माझी पत्नी हर्षा हिने देखील सन २०२० मध्ये माझे विरुध्द सदर न्यायालयात अंतरिम खावटी व न्यायालय खर्चाची रक्कम मिळणेसाठीचा अर्ज दाखल केला आहे. पत्नीने दाखल केलेल्या अर्जानुसार मा.न्यायालयाने मला ५०००/–रु. प्रमाणे खावटीची रक्कम देण्याचे आदेश दिलेले आहे. त्याप्रमाणे मी न्यायालयात दोन महिन्याचे १०,०००/– रुपये भरले आहेत. व ५,०००/–रु. पत्नीला रोख दिले आहे. परंतु माझ्या पत्नीने तिने दिलेल्या अर्जापासुन थकीत खावटीची रक्कम ८५,०००/– रुपये एक रकमी मिळणे बाबत कौटुंबिक न्यायालय जळगांव येथे माझे विरुध्द माहे ०८/२०२२ मध्ये दरखास्त दाखल केली. मी सदरची रक्कम एक रकमी जमा न केल्यामुळे न्यायालयाने माझा पत्नी नांदायला येणाचा अर्ज खारीज केला आहे. त्यामुळे मी त्या विरोधात उच्च न्यायालय मुंबई, खंडपिठ औरंगाबाद येथे अपिल दाखल केले आहे.

माझ्या पत्नीने दिलेल्या अर्जावर सुनावणी साठी मला दि.०२.०१.२०२३ रोजी समन्स व्दारे मा.कौटुंबिक न्यायालय,जळगांव येथे हजर राहण्याचा आदेश झाला होता. त्याप्रमाणे मी दि.०२.०१.२०२३ रोजी मा.कौटुंबिक न्यायालय, जळगांव येथे हजर राहीलो. त्यावेळी सदर कोर्टातील सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांना भेटलो असता त्यावेळी मी त्यांना मला एवढी रक्कम एकदम जमविण्यास वेळ लागले. तसेच मला माझ्या पत्नीने माझे विरुध्द खावटी मिळणेसाठीच्या केलेल्या अर्जावर माझे म्हणणे वकिलामार्फत सादर करण्यासाठी मला काही कालावधीची आवश्यकता आहे. त्यासाठी मला पुढची तारीख वाढवुन द्या. असे सांगितले असता त्यांनी मला सांगितले की, मी तुम्हाला पुढील महिन्याची ०२ तारीख देतो. परंतु त्यावेळी तुम्हाला मला दोन पाचशे द्यावे लागतील, असे सांगितले. त्यावेळी माझे असे लक्षात आले की, मला माझ्या प्रकारणात माझे म्हणणे सादर करण्यासाठी व पुढील तारीख वाढवुन मिळविण्यासाठी सहाय्यक अधिक्षक बडगुजर (नाना) हे दोन पाचशे रुपयाची मागणी करीत आहे. मी जर त्यांना त्यांचे मागणी प्रमाणे पैसे दिले नाहीत तर ते मला तारीख वाढवुन देणार नाही. म्हणुन मी नाईलाजास्तव त्यांना आता माझे कडे पैसे नाहीत. मी तुम्हाला नंतर आणुन देतो असे सांगितले. तेव्हा त्यांनी मला सांगितले की, तुमची पुढीची तारीख ०२.०२.२०२३ असुन त्याच्या आत तुम्ही मला एकवेळा येवुन भेटा त्यावेळेस मी तुम्हाला पुढची कोणती तारीख व किती पैसे द्यावयाचे असे सांगेल. त्यानंतर मी सदर ठिकाणाहुन निघुन आलो होतो.

सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांनी मला दि.०२.०२.२०२३ रोजीच्या आत माझे प्रकरणांचे तारखे संदर्भात भेटण्यासाठी बोलविले असल्याने, मी दि.१९.०१.२०२३ रोजी त्यांना जावुन भेटलो. तेव्हा त्यांनी मला तुमच्या प्रकरण सुनवणीची तारीख ०२.०२.२०२३ ठेवलेली आहे. त्यावेळेस मी तुम्हाला महिना पंधरा दिवस लांबची तारीख देईल तेव्हा तुम्ही मला २००/–रुपये द्या असे सांगितले. त्यानंतर मी तेथुन निघुन आलो. मी माझे कामात व्यस्त असल्याने सदर बाबत तक्रार देण्यासाठी त्यावेळी आलो नाही.

आज दि.०२.०२.२०२३ रोजी माझी कौटुंबिक न्यायालय येथे म्हणणे सादर करण्याची सुनावणी असल्याने मी आज रोजी कौटुंबिक न्यायालय,जळगांव येथे जाणार आहे. व सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांची भेट घेणार आहे. माझी सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांना २००/–रुपये देण्याची मनापासुन इच्छा नाही. परंतु मी जर त्यांना त्यांच्या मागणी प्रमाणे पैसे दिले नाही. तर ते माझे प्रकरणांत मला महिना पंधरा दिवसाची पुढील तारीख वाढवुन देणार नाही. म्हणुन मी नाईलाजास्तव सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांना त्यांनी मागणी केले प्रमाणे २००/– रुपये देण्यास तयार झालो आहे.

तसेच मी आज दि.०२.०२.२०२३ रोजी सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांची भेट घेण्यासाठी भिकमचंद जैन मार्केट मधील इमारती मध्ये भेटण्यासाठी जाणार आहे. तरी त्यांचेवर पुढील कारवाई करण्यात यावी.

माझा सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांचेशी कोणत्याही प्रकारचा पैशांचा देवाणघेवाण अथवा उसनवारीचा व्यवहार नाही अथवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचा वैरभाव नाही. त्याबाबत मी माझे स्वत:चे हस्ताक्षरात तक्रार दिली.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्र.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करण्यात आले होते. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला पंच क्र.१ यांचेसह सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांची भेट घेण्यासाठी भिकमचंद जैन मार्केट (बीजे मार्केट)येथे पाठवले होते. तेव्हा कौटुंबिक न्यायालय जळगांव च्या दालनासमोर सहायक अधिक्षक बडगुजर हे मला भेटले. त्यानंतर मी व पंच क्रं. १ असे सहायक अधिक्षक बडगुजर यांच्यासह सदर ठिकाणी इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर असलेल्या गोविंदा चहाच्या कॅन्टीन जवळ गेलो. त्यावेळी माझेत व सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांचेत माझे कामाविषयी बोलणी झाली. तेव्हा मी सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांना मला फक्त आठ पंधरा दिवसाची पुढील तारीख पाहिजे आहे असे सांगितले. तेव्हा सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांनी मला महिन्याची का? जनरली कस हे, पुढच्या महिन्याची दोन तारीख देतो असे सांगीतले. तेव्हा मी एकदम अति उत्तम होईल, तुम्ही डायसवर बसणार आहेत, तेव्हा बोलणार नाहीत असे सांगीतले असता सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांनी मग मी दोन मार्च असे सांगुन हाताचे दोन बोटाने ईशारा करुन पैसे देण्याविषयी खुणवुन द्याना तेव्हा, मी त्यांना दोनशे द्यायचे का? असे विचारले. तेव्हा सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांनी देऊन टाका न असे सांगुन २००/— रुपये लाच रकमेची मागणी केली. तेव्हा मी सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांना थांबा तो लहान भाऊ येतो आहे असे सांगुन मी सापळा पथका जवळ परत आलो होतो.

मी परत आल्यानंतर, बच्छाव साहेब,पंच व सापळा पथक यांनी माझे कडे दिलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. त्यावरुन सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांनी माझ्याकडे २००/— रुपये मागीतल्याची खात्री झाली. तेव्हा बच्छाव साहेब यांनी मला सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांना देण्यासाठी २००/— रुपये हजर करण्यास सांगीतले.

त्यानंतर मी सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांना देण्यासाठी माझे जवळ असलेले २००/—रु रक्कम बच्छाव साहेब यांचे समक्ष हजर केली. तेव्हा बच्छाव साहेब यांनी सदर नोटांना अ.पा.पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टचे वरील डाव्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं.१ यांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला पंच क्रं.१ यांचेसह सदरची रक्कम सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांना देण्यासाठी जळगांव शहरातील भिकमचंद जैन मार्केट मधील तिसऱ्या मजल्याच्यावर असलेल्या गोंवदा टि कॅन्टीन जवळ गेलो होतो. काही वेळानंतर सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांनी मला फोन केला. तेव्हा त्यांनी मला बडगुजर नाना बोलतो, असे सांगुन तुम्हाला पुढची तारीख १६.०२.२०२३ अशी दिली आहे. तेव्हा त्यांना मी तिसऱ्या मजल्याच्यावर असलेल्या गोंवदा टि कॅन्टीन जवळ बसलेलो आहे, असे सांगितले असता त्यांनी आलोच वर असे सांगुन फोन कट केला. त्यानंतर काही वेळाने सहाय्यक अधिक्षक बडगुजर हे सदर ठिकाणी आले. तेव्हा त्यांच्यात व माझेत माझे कामा संदर्भात चर्चा झाली. तेव्हा सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांनी मला त्यांच्या उजव्या हाताचा अंगठा व पहिल्या बोटाने इशारा करुन पैश्यांची मागणी केली.तेव्हा मी माझे जवळ असलेली लाच रक्कम २००/—रु. माझे शर्टचे डाव्या खिश्यातुन बाहेर काढुन ती सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांचे समोर धरली असता त्यांनी सदरची लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारली. तेव्हा मी त्यांना काही नाराज तर नाही ना? अशी विचारणा केली असता तेव्हा त्यांनी नाही, नाही, ठिक हे असे सांगुन त्यांनी सदरची लाच रक्कम त्यांचे शर्टाचे डाव्या बाजुच्या वरील खिश्यात ठेवुन घेतली. त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास ईशारा केला.त्यानंतर बच्छाव साहेब व सापळा पथक यांनी सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांना रंगेहाथ पकडले. त्यानंतर बच्छाव यांनी माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले..

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगुन त्यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव हेमंत दत्तात्रय बडगुजर, वय—५७, व्यवसाय नोकरी, सहाय्यक अधिक्षक, कौटुंबिक न्यायालय,जुने बी.जे.मार्केट, जळगांव रा.प्लॉट नं.१४, इंद्रप्रस्थ नगर, शिवाजीनगर जवळ जळगांव असे सांगितले. (खाते विधी व न्यायविभाग, वर्ग ३) असे सांगितले. त्यानंतर सहाय्यक अधिक्षक बडगुजर यांना ताब्यात घेतले. त्यानंतर बच्छाव साहेब, मी, दोन्ही पंच, सापळा पथक, सहाय्यक अधिक्षक बडगुजर असे आम्ही सरकारी वाहनाने अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयात जावुन उर्वरीत सापळा कारवाई केली आहे.

अशा प्रकारे सहाय्यक अधिक्षक, हेमंत दत्तात्रय बडगुजर यांनी माझ्या पत्नीने माझे विरुध्द अंतरीम खावटीची थकीत एकरकमी रक्कम मिळणेसाठीच्या केलेल्या अर्जावर वकिलामार्फत माझे म्हणणे सादर करण्यासाठी व थकीत रक्कम एकरकमी भरण्यासाठी पुढील तारीख वाढवुन देण्याच्या मोबदल्यात माझे कडेस २००/–रुपयांची लाच मागणी करुन सदर लाचेची सहाय्यक अधिक्षक, हेमंत दत्तात्रय बडगुजर यांनी भिकमचंद जैन मार्केट मध्ये तिसऱ्या मजल्यावर असलेल्या गोविंद टि कॅन्टीन जवळ स्वत: स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

**फिर्यादीची सही**

**समक्ष**

एस.के.बच्छाव
पोलीस निरिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, जळगांव

[कृष्णावर्धन राजेंद्र पाटील]
02.02.2023